आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२१ जुलै २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सरकारने आज बोलावलेल्या बैठकीत विरोधकांना केलं सहकार्याचं आवाहन

- जागतिक वारसा समितीच्या ४६ व्या अधिवेशनाचं उद्घाटन आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते, भारतात प्रथमच या अधिवेशनाचं आयोजन

- महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पुण्यात भारतीय जनता पक्षाच्या महाअधिवेशनाला प्रारंभ

- देशभरात गुरुपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रम

**आणि**

- मणिपूरमधे सुरक्षा कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्रात्र आणि स्फोटकं जप्त, २९६ जण पोलिसांच्या ताब्यात

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सरकारने आज सर्वपक्षीय बैठक दिल्लीत बोलावली होती. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करावं असं आवाहन सरकार तर्फे बैठकीत करण्यात आलं. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, किरेन रिजिजू, अर्जुन राम मेघवाल जेपी नड्डा, चिराग पासवान, रामदास आठवले आणि काँग्रेस नेते जयराम रमेश,

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, द्रमुक नेते टी आर बाळू आणि तिरुची शिवा, AIMIM चे नेते असदुद्दीन ओवेसी हे या बैठकीला उपस्थित होते.

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरू होणार असून उद्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन २०२३-२४ चा आर्थिक पाहणी अहवाल मांडतील. येत्या मंगळवारी २०२४-२५ वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर होईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातला हा पहिलाच अर्थसंकल्प असेल.

**<><><><><>**

जागतिक वारसा समितीचं ४६ वं अधिवेशन आजपासून नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सुरू होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संध्याकाळी ७ वाजता याचं उद्घाटन होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यात युनेस्कोच्या महासंचालक ऑड्रे अझोले आणि युनेस्को जागतिक वारसा सचिवालयातले वरिष्ठ अधिकारी तसंच विविध देशातले सांस्कृतिक मंत्री, राजदूत आणि तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. भारत पहिल्यांदाच जागतिक वारसा समितीच्या अधिवेशनाचं यजमानपद भूषवणार आहे. हे अधिवेशन वर्षातून एकदा होतं.

भारतात प्रथमच नवी दिल्ली इथं जागतिक वारसा समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून भारतासाठी ही अत्यंत आनंदाची बाब असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे. देशाचा वारसा जतन करण्याच्या मार्गांवर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी ही बैठक एक महत्त्वाचं व्यासपीठ असल्याचंही मोदी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पुण्यात भारतीय जनता पक्षाचं महाअधिवेशन होत आहे. या अधिवेशनात 5 हजार 300 कार्यकर्ते, पदाधिकारी सहभागी होणार असल्याची माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अधिवेशनाचं उद्घाटन झालं. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, माजी मंत्री रावसाहेब दानवे, आमदार आशिष शेलार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकाळच्या सत्रात मार्गदर्शन करणार आहेत. तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भाषणानं या महाअधिवेशनाचा समारोप होणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यभरात काढल्या जाणाऱ्या संवादयात्रांच्या आराखड्याला यावेळी अंतिम स्वरूप दिलं जाण्याची शक्यता आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री स्वनिधी योजना सुरू झाल्यापासून केंद्रसरकारने फेरीवाल्यांना आतापर्यंत आठ हजार सहाशे कोटी रुपयांचा निधी वाटप केलं असल्याची माहिती आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी काल दिली. नड्डा यांच्या हस्ते काल खाद्य पदार्थ विक्रेत्यांसाठी अन्नसुरक्षेसंदर्भातल्या पोर्टलचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी या विक्रेत्यांसाठी अन्नसुरक्षेसंदर्भात मार्गदर्शक तत्वंही जारी करण्यात आली. दिल्लीत काल, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या वतीनं फिरत्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांचं प्रशिक्षण आणि जागरुकता कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या विक्रेत्यांसाठी असलेले

शंभर रुपयांचं नोंदणी शुल्क प्राधिकरणानं माफ करावं, जेणेकरून अधिकाधिक विक्रेत्यांना नोंदणी करण्यास प्रोत्साहन मिळेल, असा सल्लाही नड्डा यांनी दिला.

**<><><><><>**

वैद्यकीय क्षेत्रातल्या विद्यार्थ्यांनी आयुर्वेदातल्या सिद्धांतांचा अभ्यास करून या क्षेत्रात संशोधन करावं असं आवाहन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल वर्धा इथं केलं. वर्ध्याच्या दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाच्या १५व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. या समारंभात वैद्यकीय, दंतविज्ञान, आयुर्वेद, भौतिकोपचार, परिचर्या, औषध निर्माणशास्त्र, पर्यायी उपचार शाखा आणि अन्य विद्याशाखेतल्या १ हजार ७२१ पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना दीक्षांत प्रमाणपत्र मिळालं. विविध शाखांच्या परीक्षांमध्ये सर्वोत्कृष्ट ठरलेल्या ७८ विद्यार्थ्यांना ११५ सुवर्ण, ७ रौप्य तर १३ कुलपती विशेष पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

**<><><><><>**

काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. खरगे यांना शुभेच्छांसाठी समाजमाध्यमावर लिहीलेल्या संदेशातून प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली आहे.

काँग्रेस नेते आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही काँग्रेसचे अध्यक्ष खरगे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. राहुल गांधी यांनीही खरगे यांच्या निरोगी आयुष्याची कामना केली आहे.

<><><><><>

देशभरात आज गुरू पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. हा दिवस मानवी जीवनात ज्ञान आणि अभ्यासाच्या महत्वाची तसंच आदरणीय गुरूंची आठवण करून देतो.  आजचा दिवस व्यास पौर्णिमा म्हणूनही ओळखला जातो. आजच्या दिवशी लोक आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या आणि मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना आणि आध्यात्मिक गुरूंना वंदन करून आदरभाव व्यक्त करतात. यानिमित्तानं आज शाळा, महाविद्यालयात आणि विविध समुहात विशेष कार्यक्रम आयोजित केले गेले आहेत. राज्यात शिर्डी, अमरावती आणि शेगाव इथंही गुरू पौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात आले आहेत. भगवान बुद्धांनी दिव्यज्ञान प्राप्तीनंतर आजच्याच दिवशी आपला पहिला धर्मोपदेश दिला होता. त्यामुळे बुद्ध अनुयायी देखील आजच्या दिवशी विशेष बुद्ध वंदना करतात.

गुरू वंदनेचा आजचा दिवस भारतासह भूतान आणि नेपाळमध्येही साजरा केला जातो. गुरू पौर्णिमेनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या एका पोस्टद्वारे देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

केदारनाथ पायी मार्गावर दरड कोसळल्यामुळे ३ भाविकांचा मृत्यू झाला तर ५ भाविक जखमी झाले आहेत. केदारनाथ यात्रा मार्गावर चिरबासाजवळच्या डोंगरावरून मोठे दगड आल्यानं काही यात्रेकरू ढिगाऱ्याखाली अडकल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नंदन सिंह राजवार यांनी दिली. एनडीआरएफ, डीडीआर, वायएमएफचे पथकाकडून बचावकार्य सुरू आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर धामी यांनी या दुर्घटनेत झालेल्या मृत्यूबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. आपण अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

अमरनाथ यात्रेत आतापर्यंत ३ लाख ८६ हजाराहून अधिक भाविकांनी अमरनाथ मंदिराचं दर्शन घेतलं आहे. तर ३ हजार ११३ यात्रेकरूंची दुसरी तुकडी रविवारी जम्मूहून काश्मीरला रवाना झाली. यावर्षी २९ जूनपासून ही यात्रा सुरू झाली असून पुढच्या महिन्याच्या १९ तारखेला यात्रेचा सांगता होणार आहे.

**<><><><><>**

मणिपूरमधे सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्रात्र आणि स्फोटकं जप्त करण्यात आली. इंफाळ आणि चुराचांदपूर जिल्ह्यांमधे हा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. या शोधमोहिमेदरम्यान राज्यात २९६ संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतलं असून चौकशी सुरु केली आहे. राष्ट्रीय महामार्गांवर बंदोबस्तात वाढ करुन वाहतूक सुरक्षित होईल, याची काळजी घेतली आहे. डोंगराळ भागात आण खोऱ्यात मिळून ११६ तपासणी नाके सुरु करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

नीट-यूजी प्रश्नपत्रिका फुटल्या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण संस्थेने आणखी ३ संशयितांना अटक केली आहे. यामध्ये मुख्य सूत्रधार शशिकांत पासवानचा समावेश आहे. हे तिघे भरतपूर मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी आहेत. हे सर्व जण प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी ५ मे रोजी सकाळी हजारीबाग इथं उपस्थित होते. यापूर्वी, १९ जुलै रोजी सीबीआयने नीट-यूजी प्रश्नपत्रिका फूट प्रकरणी झारखंडमधील रांची येथून एमबीबीएसच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनीला ताब्यात घेतलं असल्याचं  हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं आपल्या बातमीत म्हटलं आहे.

**//<><><><><>//**